# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 26/10/2023 (गुरूवार) सकाळ

---

### जबरी चोरी

**पो.स्टे. सावनेर** :— अंतर्गत ०३ किमी अंतरावर शक्ती नगर झोपडपट्टी आगेंवाडा सावनेर येथे दिनांक २६/१०/२०२३ चे १२.०० वा. ते १२.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— सौ. सकीना मौसीन खान वय ३० वर्ष रा. शक्तीनगर झोपडपटटी आगेंवाडा सावनेर ही आपल्या घरी हजर असता अज्ञात आरोपी हा फिर्यादीचे घरी आत येवुन फिर्यादीला मारपीट करून कपाटामधील छोटया स्टिलच्या पेटीमध्ये ठेवलेले २५०००/—रू व फिर्यादीचे कपडयाचे बॅग मधील ठेवलेले ५०००/—रू असे एकुण ३०,०००/— रू जबरदस्तीने चोरून घेवुन गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३९४, ४५२ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री. भस्मे पो.स्टे सावनेर मो. नं. ९७६४९४६८०८ हे करीत आहे.

### मोटारपंप व केबल चोरी

**पो.स्टे. खापा** :— अंतर्गत कोथुर्णा शिवार येथे दिनांक २४/१०/२०२३ चे १२.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— परमानंद बळीरामजी भांगे, वय ४७ वर्ष, रा. कोथुर्णा ता. सावनेर यांच्याकडे कोथुर्णा शिवारात १६ एकर शेती खेकडा नाला मेन कॅनलवर असुन ती शेती करतात. दिनांक १६/१०/२०२३ ला एचपी लक्ष्मी कंपनीची पाण्याची मोटार किंमती अंदाजे १०,०००/—रू. व २० मीटर काळा केबल किंमती अंदाजे २०००/— रू असा दि. २४/१०/२०२३ चे दुपारी १२.०० वा. चे दरम्यान फिर्यादी आपल्या पुतण्या सोबत शेतात गेले असता त्याची मोटार शेतात दिसली नाही. आजुबाजुच्या शेतकऱ्यांना विचारपुस केली पण त्यांना सुध्दा माहित नाही असे सांगितले. कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास हे पोलीस हवालदार प्रकाश नांदुरकर पोस्टे खापा मो. नं. ८६३५३८१५९० हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**